नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १३/०६/२०२४ (गुरूवार) सकाळ

## (All India Institute of Medical science) अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था नागपूर येथे Department of forensic Medical & Toxicology व नागपूर ग्रामीण पोलीस दलाचे संयुक्त विद्यमाने "Forensic Insight Enhancing Police Investigation skills" या विषयावर नागपूर ग्रामीण पोलीस घटकातील पोलीस अधिकाऱ्यांचे एक दिवसीय प्रशिक्षण आयोजित.

दिनांक १३/०६/२०२४ रोजी (All India Institute of Medical science) अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था नागपूर येथे Department of forensic Medical & Toxicology व नागपूर ग्रामीण पोलीस दलाचे संयुक्त विद्यमाने "Forensic Insight Enhancing Police Investigation skills" या विषयावर नागपूर ग्रामीण पोलीस घटकातील पोलीस अधिकाऱ्यांचे एक दिवसीय प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते.

सदर प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन प्रसंगी (All India Institute of Medical science) नागपूरचे कार्यकारी संचालक **डॉ. श्री. प्रशांत जोशी** तसेच प्रमुख पाहुणे म्हणुन नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस घटकाचे पोलीस अधिक्षक **श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से)** आणि डॉ. गणेश दखले परिक्षा अधिष्ठाता (AIIMS) नागपूर, डॉ. मनिष श्रीगिरीवार विभाग प्रमुख न्यायवैद्यक शास्त्र (AIIMS) नागपूर, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ नागपूर ग्रामीण तसेच जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणेदार व दुय्यम पोलीस अधिकारी त्याचप्रमाणे सर्व शाखा प्रमुख व शाखेचे दुय्यम पोलीस अधिकारी हजर होते.

नागपूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) यांनी उद्घाटनपर मार्गदर्शना दरम्यान पोलीस अधिकारी यांना पोलीस तपासात न्यायवैद्यक शास्त्राचे महत्व समजावुन सांगितले. तसेच माहे ०१/०७/२०२४ पासुन नविन कायदयाची अंमलबजावणी होत असल्याने न्यायवैद्यक पुराव्याचे महत्व वाढणार आहे. त्या दृष्टीने सर्व पोलीस अधिकारी यांनी न्यायवैद्यक शास्त्रातील बारकावे आत्मसात करून त्यामुळे येणाऱ्या काळात उत्कृष्ट तपास अधिकारी तयार होण्याकरीता न्यायवैद्यकशास्त्र शिवाय पर्याय नाही असे बहुमुल्य मार्गदर्शन केले.

डॉ. श्री. मनिष श्रीगिरीवार विभाग प्रमुख न्यायवैद्यक शास्त्र (AIIMS) नागपूर यांनी दोषसिद्धीचे प्रमाण वाढण्याकरीता न्यायवैद्यकशास्त्र व पोलीस तपासाची सांगड घालुन न्यायवैद्यक शास्त्रोक्त पद्धतीने तपास करणे व वैद्यकीय पुरावे गोळा करून न्यायपटलावर ठेवणे याबाबत अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणा दरम्यान शवविच्छेदन गृह व न्यायवैद्यक नमुन्याचे संग्रहालय कार्यशाळेला उपस्थित असलेल्या पोलीस अधिकारी यांना दाखविण्यात आले. त्या दरम्यान डॉ. शैलेश व डॉ. अशोक (AIIMS)

नागपूर फॉरेन्सिक विभाग यांनी सर्व पोलीस अधिकारी यांना बहुमुल्य मार्गदर्शन करून पोलीस तपासात न्यायवैद्यक शास्त्राचा अधिक चांगल्या प्रकारे कसा वापर करता येईल याबाबत येथोचित मार्गदर्शन केले.











पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर